# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०५/०३/२०१९
## दि.०४/०३/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे २०२/१९,भादविक ३०४(अ) |
| **फिर्यादी** | देवानंद धोत्रे, पोलीस नाईक, कोंढवा पोलीस ठाणे,पुणे शहर |
| **आरोपी** | अकिब मंजीलचे ठेकेदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/०२/२०१९ रोजी सकाळी १६/०० वा.अकिब मंजिल या तीन मजली इमारतीच्या बांधकाम साईटवर सर्व्हे नं.३५ चा हिस्सा १७/१/७ गल्ली नं.३,पानसरेनगर येवलेवाडी,कोंढवा-बुद्रुक,पुणे येथे |
| **तपशिल** | कोंढवा पो स्टे अ.मयत रजि.नं.४०/१९,सीआरपीसी १७४ अन्वये मयताचे झाले तपासाचे चौकशीअंती कागदपत्राचे अवलोकन करता,यातील नमुद इसम ठेकेदाराने त्याचे अकिब मंजिल या तीन मजली इमारतीच्या बांधकाम साईटवर सर्व्हे नं.३५ चा हिस्सा १७/१/७,गल्ली नं.३,पानसरेनगर येवलेवाडी,कोंढवा-बुद्रुक,पुणे येथील पुणे येथील बांधकाम चालु असलेल्या साईटवरील,मजुर कामगारांकडुन काम करवुन घेत असताना,कामगारांचे जिवीताचे व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन त्यांना हेल्मेट,सुरक्षित जाळी, सेफ्टी बेल्ट इत्यादी योग्य ती साधनसामुग्री पुरविणे आवश्यक असताना,त्यांना तशी कोणतीही सुरक्षित साधने न पुरविता, तसेच उघडया डक्टवर योग्य ती साधन ठेवण्याची सोय न करता,हलगर्जीपणा व निष्काळजी पणा केल्यामुळे,यातील बिगारी कामगार अनिल श्रीमंत बनसोडे,वय-३५ वर्षे,रा. अप्पर बिबवेवाडी,पुणे हा इमारतीचे दुस-या मजल्यावरुन,तिस-या मजल्यावर शौचालयाचे बाथरुमचे मोकळया डक्ट मधुन लोखंडी सळई तिस-या मजल्यावर डक्टमध्ये उभा असलेल्या शरणाप्पा हंदगी यांना देत असताना अनिल बनसोडे याचा पाय घसरुन तो नमुद वेळी व ठिकाणी डोक्यावर पडुन गंभीर जखमी होवुन मयत झाला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. व्हि.व्हि.वाडकर ९९२३२४१५२१ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | दत्तवाडी पो स्टे १५२/१९,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक परूष,वय-६५ वर्षे,रा.शाहु कॉलेज रोड,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात ई-मेलधारक व बँक खातेधारक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिं.२०/१०/२०१४ ते आजपावेतो ऑनलाईन माध्यमाव्दारे (अटक नाही) |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात ई-मेलधारक व बँक खातेधारक यान DSP ENGINEERING AND SERVICES CO.LTD या थायलंड येथील कंपनीच्या नावाने ई-मेलद्वारे मेल करून,फिर्यादी यांना नोकरीचे आमिष दाखवुन,वेळोवेळी एकुण ०३,७८,२४०/- रूपये रक्कम त्याचे बँक खात्यावर भरणा करण्यास सांगुन,फिर्यादी यांना कोणतीही नोकरी न देता,त्यांची रक्कम परत न करता,फिर्यादी यांची ऑनलाईन पध्दतीने आर्थिक फसवणुक केलेली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी. (गुन्हे) राजेंद्र शहाणे ९०११८६११४८ |

## दि.०५/०३/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | दत्तवाडी पो स्टे १५३/१९,भादविक ३०४(ब),३४ |
| **फिर्यादी** | किशोर लोखंडे,वय-२८ वर्षे,रा.मु.पो.भाळवणी,ता.पंढरपुर,जि.सोलापुर |
| **आरोपी** | १.अतुल परमेश्वर पाटोळे व त्याचे इतर नातेवाईक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे डिसेंबर २०१३ पासुन ते अदयापपर्यंत साईबाबा मंदिरा समोर,पर्वती दर्शन,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची बहीण सौ.गिता अतुल पाटोळे हिचे लग्न तीचा पती यातील नमुद इसम अतुल परमेश्वर पाटोळे याचेबरोबर होवुन ती पती बरोबर सासरी नांदत असताना,तीचा पती व इतर नातेवाईकांनी संगनमत करून,तीस माहेराहुन फ्लॅटसाठी चार लाख रूपये आणण्याच्या कारणावरून क्ररपणे वागणूक देवून,पैशाची मागणी करून,तीस टोचुन बोलुन, तीचा शारिरीक व मानसिक छळ करून,सौ.गिता पाटोळे हिस तीचे राहते घरी गळफास घेवुन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. सुर्यवंशी ७३५०६३३४६७ |

**प्रेसनोट** दिनांक २५/०२/२०१९

**छायाचित्र स्पर्धा** "पोलीस इन ॲक्शन नागरीकांची सेवा आणि सुरक्षितेसाठी कार्यरत पोलीस" या विषयावर विनामुल्य छायाचित्र स्पर्धेबाबत.

पुणे पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्या संकल्पनेतून १. प्रेस/ प्रोफेशनल छायाचित्रकार, २. हौशी छायाचित्रकार ३. पोलीस खात्यातील अधिकारी/कर्मचारी त्यांचे कुटूंबिय या गटांकरीता "पोलीस इन ॲक्शन - नागरीकांची सेवा आणि सुरक्षिततेसाठी कार्यरत पोलीस" या विषयावर **विनामुल्य छायाचित्र** स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर स्पर्धेकरीता हौशी छायाचित्रकार या गटांमध्ये कोणीही नागरिक सहभागी होवु शकतो.

सदर स्पर्धेकरीता प्रथम क्रमांक - रोख ५००० रू व शिल्ड, द्वितीय क्रमांक, - रोख ३००० रू व शिल्ड, तृतीय क्रमांक - रोख २००० रु व शिल्ड व उत्तेजनार्थ २ बक्षीसे देण्यात येणार आहेत.

प्रवेशिका http//www.pixlent.com/punepolicephotocontet या संकेतस्थळावर उपलब्ध असून फोटो (इमेज) वरील दिलेल्या संकेत स्थळावर **ऑनलाईन** पाठवावेत.

**स्पर्धेसाठीचे नियम व अटी-**

१. प्रत्येक स्पर्धकाने जास्तीत जास्त ५ इमेज JPG फॉरमॅटमध्ये ३०० DPI 5 MB साईजचे ओरीजनल व स्वत काढलेल्या इमेज असाव्यात. इमेजवर कोणत्याही प्रकारचे वॉटरमार्क, लोगो, चिन्ह नसावे
२. दिनांक २५/०२/२०१९ रोजीची ही मुदत दि.१२/०३/२०१९ पर्यंत वाढविली असुन दि.१२/०३/२०१९ पर्यंत प्रवेशिका व फोटो नमुद संकेतस्थळावर स्विकारण्यात येतील
३. निवड झालेले फोटोग्राफ्स हे आयोजक आपल्या प्रदर्शनासाठी व माहिती पुस्तीकेसाठी वापरु शकतील.
४. इमेज पाठविण्यासाठी http//www.pixlent.com/punepolicephotocontet या संकेतस्थळाचा वापर करावा. सदरचे संकेतस्थळ **रजिस्ट्रेशन केल्यानंतरच** या स्पर्धेत भाग घेता येईल.
५. प्रत्येक स्पर्धकाने त्याचा ईमेल आयडी व मोबाईल नंबर देणे आवश्यक आहे.
६. मोबाईल किंवा स्मार्ट फोन ने काढलेली छायाचित्रे सुध्दा स्पर्धेत पाठविता येतील.
७. फोटोग्राफ निवडीसाठी परीक्षक समितीचा निर्णय अंतिम राहील.

**छायाचित्र स्पर्धेसाठी पुणे शहरातील १. प्रेस/प्रोफेशनल छायाचित्रकार, २. हौशी छायाचित्रकार, ३. पोलीस अधिकारी / कर्मचारी तसेच त्यांचे कुटूंबिय असे गट आहेत. हौशी छायाचित्रकार गटात सर्व कॉलेजचे प्रिन्सीपल,व्याख्याते, कॉलेज विद्यार्थी, शिक्षकवृंद, सर्व पत्रकार, उत्सुक व इच्छुक नागरीक यांनी जास्तीत जास्त सहभाग घ्यावा. असे पुणे पोलीसांकडून आवाहन करण्यात येत आहे.**

**अधिक माहितीसाठी- संपर्क अधिकारी-**

१. श्री. अजित लकडे, पोलीस निरीक्षक, विशेष शाखा, पुणे शहर.- ८३२९८०४८३६




# Police in Action

## for Service & Security of People

Pune Police



### Photography Contest!

Open to All!

Participate, in one of three groups:

1. **Amateur/ Hobby Photographers**
2. **Police officers, staff & members of their families**
3. **Press/ Professional Photographers**

Prizes in each Group!

1st: **Rs. 5,000**
2nd: **Rs. 3,000**
3rd: **Rs. 2,000**
Two more consolation prizes

**Entry Free!**

Last Date Extended ...
**12 March 2019**

To take part & know more, go to
**www.pixlent.com/punepolicephotocontest**

जनसंपर्क अधिकारी,
पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर